<u>स्पेशल क.नं.१२/२०१६ निशाणी २४ खाली आदेश</u>

१. सदरचा अर्ज प्रतिवादी नं.२ यांचे विरूध्द केलेला 'विना कैफियत' आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, पूर्वी यातील वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान तडजोड होवून पोलीस तक्रारी व दावा काढूण घेण्याचे ठरले होते. त्यामुळे दावा काढून घेतला असेल या प्रतिवादीच्या गैरसमज झालेने सदर प्रतिवादीने वकीलांना भेटून आवश्यक ती माहिती देवून कैफियत व म्हणणे तयार करता आले नाही. त्यामुळे कैफियत दाखल करणेस विलंब झाला. त्यामुळे सदरचा विना कैफियत आदेश रद्द करावा अशी विनंती केली आहे.

२. वादी यांनी आपले म्हणण्यात असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांच्या अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. प्रतिवादी यांनी जाणुनबुजून कैफियत व म्हणणे देणेस टाळाटाळ केली आहे. सदर अर्जात नमूद केलेली कारणे संयुक्तीक नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. दाव्याच्या निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरीत्या संपूष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज प्रतिवादी यांचेवर रक्कम रू. १००/— खर्च बसवून मंजूर करीत आहे.

४. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

<u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज प्रतिवादी यांच्यावर रक्कम रू. १००/— खर्च बसवून मंजूर करणेत आला.

२. प्रतिवादी यांचे विरूध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात आला व कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

सही/—

दिनांकः—०७/०२/२०१९.

( यामीनी बोरावके )
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
गडहिंग्लज.